IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याचे योगदान

**[1]प्रा. डॉ. वाघमारे विष्णू बब्रुवान, [2]श्रीमती सुहासिनी लिंबाजी शिंदे**

[1]प्राध्यापक, विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग) एम.ए., पीएच.डी., सेट.
श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
[2]सहशिक्षिका, महाराष्ट्र विद्यालय, बार्शी

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*सामाजिक कार्याचे योगदान, श्रम हाच स्वर्ग, समाजवादी तत्त्वचिंतन, स्त्रियांना न्याय हक्क, स्त्रियांना न्याय हक्क*

**ABSTRACT**

आपल्या भारताला अनेक असे संत महात्मे यांची परंपरा लाभलेली आहे. सकल मानव जातीला संदेश देणाऱ्या थोर समाज सुधारकांची परंपरा लाभलेली आहे. गौतम बुध्द, महावीर, गुरुनानक, संत कबीर त्याचबरोबर जगाला जातिभेद वर्णभेद, लिंगभेद, झुगारुन समता, बंधुत्व कायकवे कैलास म्हणजेच 'खरे परिश्रम हेच परमेश्वर' आहे सांगणारे 12 व्या शतकातील जगतज्योती महात्मा बसवेश्वर होय.

भारतीय मध्ययुगीन इतिहासात सामाजिक समता श्रमप्रतिष्ठा आणि मानवतावाद यांचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे त्यांनी 12 व्या शतकात रुढीवादी व्यवस्थेला आव्हान देत समाज सुधारणेचा व्यापक कार्यक्रम राबविला. त्यांचे विचार केवळ धार्मिक सुधारणे पुरते मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि नैतिक मूल्यांच्या पुर्नरचनेशी निगडीत होते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Waghmare, Vishnu Babruvan, & Shinde Suhasini Limbaji.** (2025). महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याचे योगदान. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **343–347**.

**प्रस्तावना**

बाराव्या शतकामध्ये धर्माच्या नावाखाली समाजाचे आर्थिक, सामाजिक, मानसिक शोषण होत होते. जातिभेद, लिंगभेद, वर्णभेदावरुन माणूस माणसांचे शोषण करत होता. अशा परिस्थितीमध्ये एक नवक्रांतीची ज्योत पेटली. वैशाख शुध्द तृतीया नक्षत्रावर 1131 रोजी बागेवाडी गावी त्यांचा जन्म झाला. हे गाव आज विजापूर जिल्हयात आहे. त्यांचे वडिल मादिराज हे शैवब्राम्हण. ते बागेवाडीचे ग्रामनेते होते. पुरवराधीश्वर आणि ग्रामणिमणी असे गौरवाचे किताब त्यांना मिळाले होते. बसवेश्वराच्या मातेचे नाव मादलांबिका असे होते. हे दोघे अतिशय साधे राहणारे आणि प्राचीन विदयांची आवड असणारे होते. आर्थिक स्थिती बरी होती. घराण्याला चांगली विदयापरंपरा होती.

बसवेश्वरांचे आईवडील भक्तीवृत्तीचे होते. बागेवाडीतील नंदीश्वरावर त्यांची विलक्षण श्रध्दा होती. बालवयातच त्यांच्यावर शिवभक्तीचे सुसंस्कार घडले. भक्तीभावना त्यांच्या मनोमनी रुजली ; पण आचार उपचार विधिविधान याबद्दल पुर्नविचार करायला हवा असे त्यांच्या मनाने ठरविले. बसवेश्वर शुध्द भावभक्तीकडे वळले असे वर्णन भीमकवीच्या बसवपुराणात आहे. त्यांनी बसवकल्याण येथे सुधारणा चळवळ उभी केली या चळवळीचा प्रभाव केवळ त्या - त्या प्रदेशापुरता मर्यादित न राहता संपूर्ण भारतामध्ये प्रवाह निर्माण करणारा ठरला.

**उद्दिष्टे :-**

१. महात्मा बसवेश्वर यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक जीवनकार्याचा अभ्यास करणे.
२. महात्मा बसवेश्वर यांच्या समतेच्या आणि श्रमप्रधान विचार धारेचे विश्लेषण करणे.
३. समाजसुधारणेतील त्यांच्या योगदानाचे मूल्यांकन करणे.
४. स्त्रीपुरुष समानता आणि जातिनिरपेक्षते विषयीच्या त्यांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

**गृहितके :-**

१. महात्मा बसवेश्वरांचे विचार त्या काळातील सामाजिक बदलाचे माध्यम ठरले.
२. त्यांनी मांडलेली श्रमप्रतिष्ठा समाजरचना आजही योग्य आहे.
३. महात्मा बसवेश्वरांची शिकवण मानवतावादावर आधारित होती.
४. महात्मा बसवेश्वरांच्या चळवळीमुळे स्त्रियांच्या सहभागाला सामाजिक मान्यता मिळाली.

**संशोधन पध्दती :-**

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती
२. विश्लेषणात्मक पध्दती

**महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याचे योगदान :-**

भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात महात्मा बसवेश्वर यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. 12 व्या शतकातील सामाजिक परिस्थिती अत्यंत विषम होती. जातिव्यवस्थेचा अतिरेक, कर्मकांडाची अंधश्रध्दा, स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि श्रमाला कमीपणा देणारी मानसिकता समाजात रुजलेली होती. अशा काळात महात्मा बसवेश्वरांनी समतेचा मानवतेचा आणि विवेकनिष्ठ जीवनमूल्यांचा पुरस्कार केला. त्यांच्या कार्यामुळे समाजात वैचारिक जागृती निर्माण झाली. त्यांच्या सुधारणेतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्त्रीपुरुष समानतेचा पुरस्कार. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक जीवनात फारसे स्थान नव्हते परंतू बसवेश्वरांनी स्त्रियांना विचारमंथनात सहभागी करुन घेतले. त्यांनी स्त्रियांच्या आध्यत्मिक क्षमतेला मान्यता दिली. त्यामुळे त्यांच्या चळवळीत स्त्री सहभागाचा नवा अध्याय सुरु झाला.

महात्मा बसवेश्वरांनी जातिभेदाला तीव्र विरोध केला त्यांनी जन्मावर आधारित श्रेष्ठत्त्व नाकारले आणि व्यक्तीच्या

आचरणाला महत्व दिले. त्यांच्या समाजाची उभारणी नैतिकता प्रामाणिकपणा आणि परस्पर आदर यावर आधारित असावी. या दृष्टीकोनामुळे समाजात समतेची बीजे रोवली गेली. म. बसवेश्वरांचे वचन साहित्य प्रभावी माध्यम होते. त्यांनी अत्यंत साध्या व लोक भाषेतील शैलीत आपले तत्वज्ञान सांगितले त्यांच्या साहित्यामुळे सामान्य लोकापर्यंत विचार पोहचले त्यामुळे वैचारिक परिवर्तनाला चालना मिळाली.

**अनुभव मंटप :- जगातील पहिले संसद**

महात्मा बसवेश्वरांनी अठरापगड जातिधर्मातील स्त्री पुरुषांसाठी, वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी अनुभव मंटप नावाचे सामाजिक, सांस्कृतिक विचारपीठ बाराव्या शतकात स्थापन केले अनुभव मंडपाचे एकूण 777 सदस्य होते. त्यात 77 स्त्रियांचा समावेश दिसून येतो. इंग्लडच्या पार्लमेंटच्या अगोदर म. बसवेश्वरांनी ही संसद भरविली म्हणून जगातील पहिली संसद होण्याचा बहूमान अनुभव मंटपाकडे जातो. अनुभव मंटपाच्या विचारपीठीमध्ये दैनंदिन समस्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक इ. अनुभवांचे आदान - प्रदान होत असे. अनुभव मंटप सभासदामध्ये जात, पंथ, धर्म, लिंग, वय, वर्ग व्यवसाय भाषा इ. कसलाच भेदभाव पाळला जात नसे. एका अर्थांने अनुभव मंटपाच्या रुपाने जगात पहिल्या विद्यापीठाचा प्रयोग म. बसवेश्वरांनी अविष्कृत केल्याचे आपल्या संविधानातील सरनाम्यात आणि मुलभूत हक्का मध्ये दिसून येते.

**श्रम हाच स्वर्ग :-**

'कायकवे कैलास' श्रम हाच स्वर्ग होय, हे महात्मा बसवेश्वरांचे प्रसिध्द वचन आहे. कायकचा शब्दश: अर्थ देहाशी निगडीत ते सर्व असा होतो. काया म्हणजे देह अंगमेहनत किंवा व्यक्तींने केलेले कुठलेही कार्य असा त्याचा अर्थ होतो. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तींने आपला चरितार्थ चालविण्यासाठी कोणता तरी व्यवसाय केला पाहिजे. प्रामाणिकपणे कार्यरत असणे या गोष्टीला अत्यंत महत्व दिले श्रम हाच साक्षात कैलास आणि स्वर्ग होय अशी अत्यंत अर्थपूर्ण नि व्यापक भूमिका त्यांनी मांडली

**सुधारणावादी विचारांची कैवारी :-**

गोरगरिबाविषयी करुणा आणि सेवाभावी वृत्ती त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये रुजविली धनिक व त्यांच्या अहंकारी वृत्तीचा महात्मा बसवेश्वरांनी तीव्र विरोध केल्याचे दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी गरीब राहण्यातच खरी धन्यता मानली आहे.

**समाजवादी तत्त्वचिंतन**

लोकांच्या अस्मितेला त्यांनी आवाहन केले. गरिबांचे कैवारी होण्यासाठी निव्वळ दरिद्री लोकांच्या घरी जायला त्यांच्यासोबत भोजन करायला, त्यांना मुळीच संकोच वाटत नसे. भिक्षा मागून लाजिरवाणे जीवन जगणे बसवेश्वरांना मुळीच मान्य नव्हते.

**क्रांतीकारक समाजसुधारक :-**

महात्मा बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा क्रांतिकारक स्वरुपाच्या होत्या. त्यानी पुरस्कृत केलेली आदर्श तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहारात व आचरणात आलेली होती. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिकवण समजली होती आणि त्यामुळेच असंख्य लोक त्यांचे अनुयायी झाले होते. भारताच्या इतिहासात बाराव्या शतकात एवढया मोठया स्वरुपाची धार्मिक आणि सामाजिक चळवळ दिसत नाही. एवढया मोठया सामाजिक व धार्मिक क्रांतीचा प्रणेता असलेले म. बसवेश्वर हे अद्वितीय नम्रताभाव असलेला माणूस होता.

**स्त्रियांना न्याय हक्क :-**

बाराव्या शतकात स्त्रियांना पुरुषासारखे हक्क आणि अधिकार नव्हतें. सामाजिकदृष्टया त्यांचा दर्जा कनिष्ठ होता. या

परिस्थितीमुळे स्त्रियांवर अन्याय होतो. त्यांनी न्याय, हक्क आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी आग्रही भूमिका घेतली. स्त्रियांना चांगले शिक्षण मतस्वातंत्र्य, समता स्वातंत्र्य, चर्चा, स्वातंत्र्य आणि आध्यात्मिक उपासनेची परवानगी इत्यादिसाठी आग्रह धरला स्त्रियांना विविध व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित केले. या शतकात जवळपास बत्तीस स्त्रियांनी वचने लिहिलेली आहेत. अक्कामहादेवी, राणी महादेवी, मुक्ताआक्का, रेवम्मा, लक्काम्मा गंगाबिका, निलबिका, सोमग्या, मोळीगे लखम्मा यांनी रचली आहेत. अठरापगड जातीमधील स्त्रियांना ताठ मानेने जगायला आणि निर्भय डोळयांनी समाजाकडे पाहायला शिकवले. स्त्रियांमध्ये स्वाभिमान, लेखन-वाचन-संवाद, स्वातंत्र्य, श्रमप्रतिष्ठा, विवेकशील इ. शिकवण विकसित करण्यात आली.

**देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ :-**

देवालयापेक्षा देहालयाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारा मध्ययुगातील सर्वश्रेष्ठ संत म्हणून महात्मा बसवेश्वरांकडे पाहिले जाते. त्या काळात मंदिरे म्हणजे प्रस्थापित धार्मिक आणि सामाजिक संस्थाच होत्या. सर्व व्यवहार मंदिराभोवती केंद्रिभूत होता. पाशुपत शैव धर्माचे साधू त्या काळात मंदिरात मंदिराशी संबंधित असलेल्या मठात राहत असत. ते बसवेश्वरांना मात्र मंदिरे धनिकांचा आणि धार्मिक माथेफिरुंचा विषर्यस्त सामाजिक व्यवहार वाटत असे. देवालय स्थिर असते तर देहालय चलित असते.

**बाहय अवडंबर आणि दांभिकतेचा विरोध :-**

सर्वशक्तिमान परमेश्वरांची भक्ती साधन व पूजा अर्चा करण्याच्या पध्दतीला पुरोहितांनी अनिष्ठ वळण लावले. ईश्वर भक्तीच्या वेगवेगळया प्रकराचे दरफलक लावले. त्यामुळे भक्ती क्षेत्राला बाजारी स्वरुप प्राप्त झाले. संत गाडेबाबांनी 'देव बाजारचा भाजीपाला नाही रं' असे आपल्या कीर्तनातून पुन्हा पुन्हा सांगितले होते. म. बसवेश्वरांनी दांभिकतेचा बुरखा फाडण्याचा साहसाने प्रयत्न केला असून अंधश्रध्दा कर्मकांड, संन्यस्तवृत्ती, होमहवन, बलीप्रथा, तीर्थयात्रा, व्रते उपास, तपास, उदयापन या सर्व प्रकारावर प्रखर हल्ला केला होता.

**दासोह :-**

सचोटीने व प्रामाणिकपणे धनसंपत्ती कमवावी आणि नंतर संपत्ती उरलीच तर तिचा विनियोग गुरु लिंग जंगम यांच्या सेवेसाठी करा. अतिरिक्त संपत्ती वाटायाची कल्पना दासोह या नावाने ओळखली जाते. आपल्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर जी संपत्ती उरते ती लोककल्याणसाठी खर्च करावी असा दासोहचा मुख्य उद्देश आहे. कोणतेही श्रमकार्य निष्ठेने करावे. त्यात पूर्णत: तल्लीन व्हावे माणसाला सन्मानाने जगण्यासाठी किमान धन आवश्यक असते. कायकावरच समाजाचा व जगाची गतिमानता अवलंबून असते. दासोह म्हणजे कमविलेल्या संपत्तीचे गरजू लोकामध्ये वितरण होय. समतेवर शांततेच्या निकषावर आधारलेली आर्थिक क्रांती शक्य आहे. हे म. बसवेश्वरांनी 12 व्या शतकात दाखवून दिले.

**निष्कर्ष :-**

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात समाजपरिवर्तनाची जी क्रांती घडवून आणली ती केवळ धार्मिक किंवा अध्यात्मिक नव्हे, तर व्यापक सामाजिक पुर्नरचनेची चळवळ होती. त्या काळातील जातिभेद, अंधश्रध्दा, स्त्री-पुरुष विषमता आणि कर्मकांडप्रधान व्यवस्था यांना त्यांनी निभिडपणे विरोध केला. 'कायकवे कैलास' आणि 'दासोह' या त्यांच्या तत्त्वज्ञानातून श्रमाला प्रतिष्ठा, समतेला, अधिष्ठान आणि परस्पर सहाकार्याला सामाजिक मूल्य प्राप्त झाले.

बसवेश्वरांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी माणसामाणसांतील भेद मिटवून मानवतेला केंद्रस्थानी ठेवले. अनुभव मटपाच्या माध्यमातून त्यांनी लोकशाही विचार, मुक्त चर्चा, आणि बौध्दिक संवाद यांना प्रोत्याहन दिले. या मंचावर स्त्रिया, शुद्र, दलित आणि वंचित घटकांना समान संधी देऊन त्यांनी सामाजिक न्यायाची ठोस पायाभरणी केली. त्यामुळे बसवेश्वरांची चळवळ ही भारतीय इतिहसातील पहिली लोकशाही विचारसरणीची प्रयोगशाळा मानली जाते.

स्त्री सक्षमीकरणाच्या क्षेत्रातही त्यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. अक्कमहादेवी गंगाम्बिका यांच्या सारख्या स्त्रियांना

आध्यात्मिक व बौध्दिक नेतृत्त्वाची संधी देऊन त्यांनी स्त्रीला केवळ घरापुरती मर्यादित न ठेवता समाज निर्मितीची सक्रिय भागीदार बनवले. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देऊन त्यांना सामाजिक समतेचा प्रत्यक्ष आदर्श घालून दिला. ज्यामुळे त्यांच्या विचारांना क्रांतिकारी स्वरुप प्राप्त झाले. आजच्या आधुनिक, लोकशाही आणि संविधानिक मूल्यांवर आधारित समाजात बसवेश्वरांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समानता, बंधुता, श्रमाची प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णूता आणि सामाजिक न्याय ही तत्त्वे आजही समाजाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या वचनांमधील साधेपणा, तत्वज्ञानातील मानवतावाद आणि कृतीशील प्रामाणिकपणा यामुळे ते केवळ संत किंवा तत्त्वज्ञ नव्हे तर 'युगपुरुष' म्हणून ओळखले जातात.

महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक कार्य हे समाजाला नव्या मुल्यांची दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे ठरले त्यांनी उभारलेली समतेची, श्रमप्रतिष्ठेची आणि मानवतेची भक्कम पायाभरणी आजही समाजासाठी दीपस्तंभ आहे. त्यामुळे बसवेश्वरांचे विचार केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आधुनिक समाजाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्याचा वारसा जपत समाजात समता, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. अशोक, महात्मा बसवेश्वर, कामत प्रकाशन, सत्संग प्रतिष्ठान, ऑगस्ट 1999
२. डॉ. रोडे सोमनाथ, सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, विदयाभारती प्रकाशन, अमरावती, 2010
३. डॉ. अशोक पगार, महात्मा बसवेश्वर चरित्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2012
४. प्रा. द. ता. भोसले, बसवेश्वर आणि त्यांचे वचन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2008
५. डॉ. सुनील चव्हाण, क्रांतिकारक महात्मा बसवेश्वर, साकेत प्रकाशन, संभाजीनगर, 2015
६. प्रा. रा. ना. पाटील, महात्मा बसवेश्वर जीवन व कार्य, विदया प्रकाशन, नागपूर
७. प्रा. म. भा. शिंदे, बसवेश्वर विचार दर्शन प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2010